A.Prdane

**वाचा**:- १) महाराष्ट्र जि प व पं स अधिनियम १९६१ मधील कलम ९६ (१) अन्वये
२) मा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि प जळगांव यांचेकडील मंजूर टिपणी दि१५/०५/२०१७

---

**आदेश**

आदेश क्रं साप्रवि/आस्था-४/आरआर/७७ /२०१७
सामान्य प्रशासन विभाग जि.प.जळगांव
दिनांक१७/०५/२०१७

महाराष्ट्र जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१) तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या अधिकार या आदेशान्वये जिलहा परिषदेच्या नियंत्रणाखालील खाते प्रमुख, कार्यालय प्रमुख, गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांना कार्यालयीन व प्रशासकीय कामांचा उठाव होणेचे दृष्टीने सोबतच्या तक्त्यामध्ये नमूद केले प्रमाणे खालील अटीवर प्रदान करण्यात येत आहे.

१) अधिकार प्रदान केले नंतर अधिकाराचे वापर करतांना त्यांची जबाबदारी ही संपूर्णतः त्या खाते प्रमुख व कार्यालयीन प्रमुख यांची राहील.

२) या पुर्वी सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल सर्व आदेश या आदेशान्वये अधिक्रमित करणेत येत आहेत.

३) या व्दारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर संबधित अधिका-याने त्या विषया संदर्भात निर्गमित केलेल्या शासन आदेशाचे पालन करावयाचे आहे.

४) एखाद्या प्रदान केलेल्या अधिकाराचे संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी हे स्वतः संबधीत अधिका-यांशी सल्लामसलत करुन किंवा स्वतःहून आवश्यक ते निर्णय घेतील.

५) सदरच्या अधिपकाराचा वापर म्हणून अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार तसेच शासनाच्या अन्य अटीस अधिन राहून करणेचा आहे.

६) सदर आदेशाची अमंलबजावणी या आदेशाच्या दिनांका पासून सुरु होईल.

७) सदर अधिकार प्रदान आदेशात आवश्यकते नुसार बदल करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

सदरचे आदेश निर्गतीचे दिनांकापासून अमंलात येतील.

(स्वाक्षरी)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, जळगांव**

**प्रत**- म. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कडे माहितीसाठी सविनय सादर

**प्रत - माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना,**

१) सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद, जळगांव

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व

३) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व

४) बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास प्रकल्प, सर्व

५) उप अभियंता (बांधकाम / सिंचन / ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ यांत्रिकी ) सर्व

६) तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

७) वैद्यकीय अधिकारी, प्रा आ केंद्र (सर्व), जि जळगांव

## जिल्हा परिषद, जळगांव

### अधिकार प्रदान

| अ नं. | अधिकाराचा प्रकार | कोणत्या अधिकारान्वये अधिकार मा मु का अ यांना प्राप्त झाले | कोणत्या अधिकारा आधारे सदर अधिकार प्रदान करावयाचे आहे | अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | किरकोळ रजा / ऐच्छिक सुटी / विशेष किरकोळ रजा | ग्रा वि वि नं डिझेडपी / २२६२/ दि-५/१/१९६२ म जि प जि सेवा (किरकोळ रजा / विशेष किरकोळ रजा) नियम १९६४ मधील कलम ३ | म जि प व पं स अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१) | खाते प्रमुख | त्यांचे अधिपत्याखालील काम करीत असलेले वर्ग २ चे अधिकारी व त्याचें अधिपत्याखालील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी | शासनाने वेळोवेळी केलेले नियम व विनियम लक्षात घेवून रजा मंजूर करण्यात याव्यात |
| | | | | कार्यालय प्रमुख | त्याचें अधिपत्याखालील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी | |
| २ | दिर्घ मुदतीच्या रजा | म जि प व पं स अधिनियम १९६१ चे कलम ९५ (२ ) (अ) (तीन) | म जि प व पं स अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | बांधकाम, कृषि, समाजकल्याण, पशुसंवर्धन व लघु सिंचन या पाच विभागाकडील वर्ग ३ (तांत्रिक) कर्मचाऱ्याचे २४१ ते ३६५ दिवसापर्यंत रजा | |
| | | | | खाते प्रमुख | त्यांचे अधिपत्याखालील सबंधित संवर्गातील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्योंचे सर्व प्रकारच्या १८१ ते २४० दिवसा पर्यंतच्या नियमित रजा प्रसुती रजेसह ( टी बी / कॅन्सर/ विशेष रजा / असाधारण रजा वर्गळून) | |
| | | | | कार्यालय प्रमुख | अधिनस्त असलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्योंचे सर्व प्रकारच्या नियमित १८० दिवसा पर्यंतच्या रजा प्रसुती रजेसह ( टी बी / कॅन्सर/ विशेष रजा / असाधारण रजा वर्गळून) (तांत्रिक कर्मचारी वर्गळून) | |
| | | | | उप मु का अ (साप्र) | सर्व संवर्गातील वर्ग ३ व वर्ग ४ यांच्या १ वर्षापर्यंतच्या सर्व प्रकारच्या रजा (२४१ ते ३६५ दिवसापर्यंत ) | |
| ३ | खास रजा व विकलांग रजा | म जि प जि से (वैदयकीय परिचर्या) नियम १९७१ कलम २२ | कलम ९६ (१) | उप मु का अ (साप्र) | जिल्हा परिषदेकडील वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचाऱ्यांची सर्व खास रजा (क्षयरोग / कर्करोग / पक्षघात इ.) | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगाव

| अ नं. | अधिकाराचा प्रकार | कोणत्या अधिकारान्वये अधिकार मा मु का अ यांना प्राप्त झाले | कोणत्या अधिकारा आधारे सदर अधिकार प्रदान करावयाचे आहे | अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ४ | शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार | म जि प जि से (शिस्त व अपिल) नियम १९६४ | कलम ९६ (१) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | बांधकाम, कृषि, समाजकल्याण, पशुसंवर्धन व लघु सिंचन या पाच विभागाकडील वर्ग ३ (तांत्रिक) कर्मचारी यांना शिस्तंभंगाची कार्यवाही म्हणून सौम्य शिक्षा देणे | सौम्य शिक्षा करण्याचे अधिकार म जि से (शिस्त व अपील) नियम १९६४ नियम ४ मधील (एक) (दोन) (तीन) प्रमाणे देण्यात आलेले असून शिक्षा करावयाची कार्यवाही उक्त नियमातील क्र ७ प्रमाणे (सक्त ताकीद देणे, ठपका ठेवणे, तात्पुरती वेतन वाढ थोपविणे) |
| | | | | उप मु का अ (साप्र) | त्यांचे संवर्गातील जि प च्या वर्ग ३ वर्ग ४ सर्व कर्मचाऱ्यांना सौम्य शिक्षा देणे | |
| | | | | खाते प्रमुख | त्यांचे संवर्गातील जि प च्या वर्ग ३ वर्ग ४ सर्व कर्मचाऱ्यांना सौम्य शिक्षा देणे | |
| | | | | ग वि अ | तालुका स्तरावरील त्यांचे अधिनस्त वर्ग ३ व वर्ग ४ सर्व कर्मचाऱ्यांना किरकोळ शिक्षा देणेचे अधिकार | |
| ५ | आहरण व संवितरण जिल्हा निधीतून रक्कम काढणे | म जि प व पं स अधिनियम १९६१ चे कलम ९५ (२ ) (ग) व ग्रा वि वि शा नि क्रं.झेडपीए-२०१६/प्र.क्र.१५/वित्त-९ दि.९/८/२०१६ | कलम ९६ (१) | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | सर्व अधिकार जिल्हा मुख्यालयातील स्तरावर रु.२ लाख पेक्षा जास्त | सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरी नंतर |
| | | | | उप मु ले वि अ | रु २ लाख पर्यंत | |
| | | | | ग वि अ | सहाय्यक ग वि अ यांचेकडील विभाग वगळून सर्व अधिकार पं स स्तरावर | |
| | | | | स ग वि अ | कृषि, पशुसंवर्धन व समाज कल्याण विभागाकडील सर्व अधिकार पं स स्तरावर | |
| ६ | एका वर्षावरील परंतु तीन वर्षाच्या आतील वेतन व भत्ते देयके अदा करणेस मंजूरी देणे | बी सी एस आर रुल ५९८ परिशिष्ट १ अ व बी सी एस आर कलम २ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | त्यांचे कार्यालयातील सर्व वर्ग ३ वर्ग ४ कर्मचारी व त्यांचे कार्यक्षेत्रातील काम करणारे वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी | कर्मचाऱ्यांची मंजूरी दैनदिनी सादर असल्याचे पाहून व बजेट तरतूदीच्या उपलब्धतेनुसार |
| | | | | ग वि अ | पंचायत समिती स्तर त्यांचे कार्यक्षेत्रातील काम करणारे वर्ग ३ व वर्ग ४ सर्व कर्मचारी | |
| ७ | प्रवास भत्ते बिलावर नियंत्रण अधिकारी म्हणून स्वाक्षरी | कलम ९६ (१) | कलम ९६ (१) | खाते प्रमुख<br>ग वि अ | जिल्हास्तर<br>पंचायत समिती स्तर | |
| ८ | वेतन व भत्ते अग्रीम | मुंबई वित्तीय अधिनियम १९५९ रुल नं १४२ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | त्यांचे अधिपत्याखालील काम करणारे वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी व वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी | १. शासन निर्णय, नियमावली मार्गदर्शन इ. बाबतची खात्री करुन २. तीन महिन्यापेक्षा जास्त काळ अग्रीम प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेणे. ३. पहिले अग्रीम समायोजित झालेनंतर दुसरे अग्रीम अनुज्ञेय राहील. ४. वित्त विभागाचे सहमतीने |
| | | | | ग वि अ | तालुका स्तरावरील त्यांचे अधिनस्त वर्ग ३ व वर्ग ४ सर्व | |
| | | | | कार्यालय प्रमुख | त्यांचे अधिनस्त कार्यरत वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी | |



मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगाव

| अ नं. | अधिकाराचा प्रकार | कोणत्या अधिकारान्वये अधिकार मा मु का अ यांना प्राप्त झाले | कोणत्या अधिकारा आधारे सदर अधिकार प्रदान करावयाचे आहे | अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ९ | सण अग्रीम मंजूर करणे | | कलम ९६ (१) | खाते प्रमुख / कार्यालय (जि प स्तरावर) ग वि अ / कार्यालय प्रमुख (तालुका स्तरावर) | त्याचे कार्यक्षेत्रात काम करणारे वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी | १) शासन नियम व अटीस अधिन राहून (२) सदर सण अग्रीम नोदवही अग्रीम मंजूर करणारे अधिकाऱ्याने ठेवावी (३) उप अभियंता, वैदयकीय अधिकारी , ग शि अ , बा वि प्र अ यांनी सण अग्रीम नोंदवहीचा ताळमेळ ग वि अ यांचे कार्यालयात ठेवलेल्या सण अग्रीम नोंदवहीशी घ्यावा (४) सर्व खाते प्रमुखांनी अग्रीम नोंदवहीचा ताळमेळ दर तीमाहीस अर्थ् खात्यातील अग्रीम नोंदवहीशी घ्यावा. |
| १० | इतर अग्रीम | म जि प व पं स लेखा संहिता १९६८ नियम २१० | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | त्यांचे अधिपत्या खालील वर्ग १ व वर्ग २ चे अधिकारी आणि वर्ग ३ व वर्ग ४ चे कर्मचारी रु १००००/- पर्यंत | शासन निर्णय व संबंधित नियमावलीस अनुसरुन ज्या कारणासाठी इतर अग्रीम मंजूर करणेचा आहे त्यास पुरेशी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध असली पाहिजे व रु १००००/- वरील अग्रीम मा मु का अ यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. २) पूर्वीचा अग्रीम समायोजित झाल्याची खात्री करुन नविन अग्रीम मंजूर करावा ३) अग्रीन चे समायोजन १ महिन्यात करणे आवश्यक आहे. ४) अग्रीम वित्त विभाग / अर्थ शाखेच्या सहमतीने मंजूर करावा. (तालुकास्तरावरील त्यांचेकडील अर्थ शाखा) |
| | | | | ग वि अ | पं स स्तरावरील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी रु ५०००/- पर्यंत | |
| ११ | भ नि नि मधून खास अग्रिम मंजूर करणे (ना परतावा) | म जि प भ नि नि नियम १९६६ मधील नियम २६ व १२ सी | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | त्यांच्या संवर्गातील काम करणारे वर्ग ३ व ४ च कर्मचारी (जि प मुख्यालयात काम करणारे संवर्गीय कर्मचारी यांचे परतावा/नापरतावा, जीपीएफ अग्रिम सह) | शासन नियम अटीस अधिन राहून व कार्यालय प्रमुखांची शिफारस पाहून |
| १२ | भ नि नि मधुन तसलमात (परतावा) | म जि प भ नि नि नियम १९६६ मधील नियम २६ व १२ सी | कलम ९६ (१) | जिल्हा स्तरावर खाते प्रमुख तालुका स्तरावर ग वि अ | खाते प्रमुखांचे कार्यालयातील व गट स्तरावरील सर्व वर्ग .३ व ४ चे कर्मचारी | शासन नियम व अटीस अधीन राहून |
| १३ | पोष्टाची तिकीटे खरेदी करणे (एका वेळी) | सादील खर्च नियम ११ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | रु.५०००/- | विहीत वित्तीय नियमांचे पाल करणे. अंदाज पत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून खर्च करणे या बाबत अग्रिम मंजूर करणेत येऊ नये. आवश्यकते नुसार पोष्टातुन खरेदी करणे |
| | | | | ग वि अ | रु.३०००/- | |
| | | | | कार्यालय प्रमुख | रु.२०००/- | |



मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगाव

| अ नं. | अधिकाराचा प्रकार | कोणत्या अधिकारान्वये अधिकार मा मु का अ यांना प्राप्त झाले | कोणत्या अधिकारा आधारे सदर अधिकार प्रदान करावयाचे आहे | अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १४ | सादीलवार खरेदी करणे | सादील खर्च नियम ११ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख<br>गविअ<br>कार्यालय पमुख | रु.५००००/- | सादीलवार खरेदी दि.२/१/९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे करणे. उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीस अधिन राहून खर्च करणे. लेखासंहिता-नियम १४२ नुसार वित्त विभाग/अर्थ शाखेच्या सहमतीने खरेदी करणे तसेच या बाबतीत असणाया इतर नियमांचे पालन करणे. पूर्ण अधिकार (तालुकास्तरावर पं स कडील वित्त विभागाचे सहमतीने ) (वार्षिक दरकरार उपलब्ध असल्यास त्या प्रमाणे खरेदी करणे) |
| १५ | पुस्तक खरेदी (वार्षिक) | सादील खर्च नियम ११ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | रु.३०००/- | विहित शासन नियमांच्या व वित्तीयच नियमांच्या आधिन राहून |
| | | | | ग वि अ | रु.२०००/- | |
| | | | | कार्यालय प्रमुख | रु.१०००/- | |
| १६ | संगणक, प्रिंटर, झेरॉक्स मशिन देखभाल दुरुस्ती वार्षिक ठेका/दरकरार निश्चित करणे | अधिनियम १९६१ कलम १०५ | कलम ९६ (१) | जिल्हा स्तरावर खाते प्रमुख /कार्यालय प्रमुख तालुका स्तरावर ग वि अ | पुर्ण अधिकार | वित्त विभाग/अर्थ शाखेच्या पूर्व सहमतीने व मंजूर तरतूदीच्या अधिन राहून तसेच वार्षिक दर करार (असल्यास) अधिन राहून खरेदी करणे. |
| १७ | छपाई (वार्षिक) | अधिनियम १९६१ कलम १०५ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख | रु.१००००/- | विहित वित्तीय नियमांचे पालन करणे म.जि प व पं स लेखासंहिता १९६८ नियम १४२ प्रमाणे वित्त / अर्थ शाखेचे पूर्व सहमतीने खर्च करणे सांगली/ सातारा जि प मुद्राणालयाकडून करावी किं वा ना हरकत प्रमाणपत्र घेऊन विहित नियमानुसार कार्यवाही करणे. |
| | | | | ग वि अ | रु.५०००/- | |
| | | | | कार्यालय प्रमुख | रु२०००/- | |
| १८ | दुरध्वनी | अधिनियम १९६१ कलम १०५ | कलम ९६ (१) | खाते प्रमुख<br>ग वि अ<br>कार्यालय प्रमुख | पुर्ण अधिकार | १) कार्यालयीन दुरध्वनी वरील खर्च शासनाच्या नियमानुसार योग्य त्या नोंदवहीत नोंदी करुन (खाजगी सोडून) अदा करणे. विलंब आकार वगळून) २) निवासी दुरध्वनी शासनाचे विहित केलेल्या मर्यादेच्या आधिन राहून |



मुख्य कार्यकरी अधिकारी
जिल्हा परिषद,जळगाव